महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES

म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४

Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.

Phone: 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176

E-mail: pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com

क्रं. मआविवि/पीआर/३३७/२०११ वृत्त प्रसिध्दीसाठी दि. २३ मार्च २०११

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे संशोधन पध्दतीवर जी.सी.पी. कार्यशाळेचे आयोजन

"विद्यार्थ्यांनी संशोधन वृत्ती जोपासावी"

- ले.जन.डॉ.एम.ए. टुटाकने

नाशिक (दि.२३) - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखा संशोधन व तंत्रज्ञान विभागातर्फे "गुड क्लिनिकल प्रॅक्टीसेस ॲण्ड रिसर्च मेथोडॉलॉजी" या विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन प्रमुख अतिथी सिंम्बॉसिस इंटरनॅशनल युनिर्व्हसिटीचे माजी कुलगुरु ले.जन. डॉ.एम.ए. टुटाकने यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी सन्माननीय अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्रति कुलगुरु मा.डॉ. ए.पी. कुलकर्णी, आंतरविद्याशाखा संशोधन विभागातील संचालक प्राध्यापक प्रभाकर कुल्हाळी व्यासपीठावर उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये दडलेले संशोधन गुण, वैद्यक निती मूल्यांची जोपासना व वृध्दी या अनुषंगाने दरवर्षी या कार्यशाळेचे आयोजन केले जाते.

यावेळी आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ.एम.अे.टुटाकने म्हणाले की, विद्यार्थ्यांनी संशोधन वृत्ती बाळगणे गरजेचे असून बाजारात येणाऱ्या नवनवीन औषधांचा परिणाम या बरोबरच त्यांची उत्पादन क्षमता आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न याचा देखील विद्यार्थ्यांनी अभ्यास करणे गरजेचे आहे. तसेच तयार करण्यात आलेल्या औषधांचा दर्जा, त्याबरोबरच त्यांची विश्वासार्हता, त्यांची पुर्नउत्पादन क्षमता यांचा देखील प्राधान्याने विचार करुन निपक्षपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी क्लिनिकल रिसर्च क्षेत्रामध्ये भारताबरोबरच जगात होत असलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्राचीन आरोग्य विद्याशाखांकडे शास्त्रीय दृष्टया आणि जिज्ञासात्मक दृष्टीकोनातून पाहण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी सन्माननीय अतिथी विद्यापीठाचे प्रति कुलगुरु मा.डॉ. ए.पी. कुलकर्णी यांनी आयुर्वेद, युनानी व इतर आरोग्य विद्याशाखांचे महत्व विषद करतांनाच काळानुरुप संशोधनाअंती झालेले बदल आत्मसात करण्याची गरज असल्याचे सांगितले. त्याच बरोबर आंतरविद्याशाखा संशोधन पध्दतीचे गुण आणि दोष याबाबत माहिती दिली.

सदर कार्यशाळेचे एम.एस्सी. फार्मास्युटीकल्स मेडिसिन पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता आयोजित करण्यात आली होती. औषध निर्माण पध्दतीवर कसे संशोधन करावे, सद्य स्थितीत जागतिक बाजारपेठेत असलेल्या औषधांची मागणी व पुर्तता त्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत डॉ. रविंद्र घुई, डॉ.सौमी दासगुप्ता, डॉ. कला कुलकर्णी, डॉ.चंद्रागौडा पाटील, डॉ. डांगे, डॉ. भूषण नेमाडे, श्री. अविनाश खैरनार आदी मान्यवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला शंभराहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी प्रमुख अतिथी ले.जन.डॉ.एम.ए. टुटाकने यांचे स्वागत प्रति कुलगुरु डॉ.ए.पी. कुलकर्णी यांनी केले तर सन्माननीय अतिथी प्रति कुलगुरु मा.डॉ.ए.पी. कुलकर्णी यांचे स्वागत संचालक प्राध्यापक प्रभाकर कुल्हाळी यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने होऊन मान्यवरांच्या हस्ते दीप-प्रज्वलन करण्यात आले. यानंतर कार्यशाळेनिमित्त तयार करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी डॉ. धनंजय सांगळे, डॉ. एस.डी. गुळभिले, श्री.आर.डी. शेजवळ आदींनी परिश्रम घेतले.

कुलसचिव


MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
University Department of inierpathy Research & Technology (UDIRT)
Workshop on Good Cli
ice & Research Methodology
Mr.Prabhakar M. Kulhalli
Lt.Gn.(Dr.)Tutakne
Chief Guest
Dr. A. P. Kulkarr